# प्रेसनोट

नाशिक,
दि. २३/०३/२०२३

## आलोसे सुधाकर विश्वनाथ सोनवणे, कृषी पर्यवक्षक, ता.मालेगांव.जि.नाशिक यांनी २,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | मालेगाव तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं. १७०/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | सुधाकर विश्वनाथ सोनवणे, वय ५४ वर्षे, कृषी पर्यवक्षक, कृषी विभाग, मालेगांव. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार व त्यांचे भाऊ यांची नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत ठिबकसिंचन बाबीसाठी लाभार्थी म्हणून निवड करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अटीनुसार तक्रारदार व त्यांचा भाऊ यांनी त्यांचे शेतजमीनीवर फळ बाग लागवड करून ठिबक सिंचन चे काम केले आहे. सदर ठिबक सिंचनच्या कामाच्या फाईलची तपासणी करून बीले ऑनलाईन अपलोड करणेसाठी आलोसे **सुधाकर विश्वनाथ सोनवणे, कृषी पर्यवक्षक,कृषी विभाग, ता.मालेगांव.जि.नाशिक** यांनी प्रत्येक फाईलचे १,०००/- रू. असे एकुण २,०००/-रू. लाचेची लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे **सुधाकर विश्वनाथ सोनवणे, कृषी पर्यवक्षक, कृषी विभाग, ता. मालेगांव, जि.नाशिक** यांनी तक्रारदार यांचेकडुन २,०००/- रूपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि. २१.३.२०२३ रोजी कौळाणे (निं), ता. मालेगांव, गावाचे बस स्टॉप जवळ बंद टपरी समोर स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असून त्यांचेविरुध्द मालेगाव तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं. १७०/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

२५/०३/२३
( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.